## आधीच्या मालिकेतील मदत रोख्यांची हस्तांतरणीयता

सं. क्र. सीओ.डिटी.१३.०१.२७२/२००२-०३

जुलै १७, २००२

आरडीज, सर्व विभागीय कार्यालये
भारती स्टेट बँक आणि तिच्या सहयोगी बँका,
१८ राष्ट्रीयीकृत बँका,
४ खाजगी क्षेत्रातील बँका आणि एससीएचआयएल

माननीय महोदय,

**आधीच्या मालिकेतील मदत रोख्यांची हस्तांतरणीयता**

आम्ही असा सल्ला देत आहोत कि, आधीच्या मालिकेतील, मार्च १, २००२ पूर्वी निर्गमित केलेल्या आणि मुदतपूर्ती न झालेल्या रोख्यांची दुय्यम बाजारातील खरेदी नवीन गुंतवणूक समजण्यात येऊ नये आणि प्रति गुंतवणूकदाराच्या वार्षिक रु. २ लाखाच्या मर्यादेत समाविष्ट करावी. त्यानुसार, गुंतवणुकदाराला प्रति गुंतवणूकदाराच्या रु. २ लाखाच्या मर्यादेच्या बाहेर आणि उपरांत आधीच्या मालिकेतील मुदतपूर्ती न झालेल्या रोख्यांची दुय्यम बाजारातील खरेदी खुली राहील. कार्यालयांकडे प्रलंबित असलेली हस्तांतरणाची प्रकरणे आता निकालात काढावीत.
कृपया पोंच द्यावी.

आपला विश्वासू
(आर.सी.दास)
महाव्यवस्थापक